**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३८५/२०१६ मधील नि.८ वरील आदेश</u>**

अर्जदाराने सदरचा अर्ज महिलांचे घरगुती हिंसाचारापासुन संरक्षण कायदा २००५ चे कलम २३ नुसार अर्जदारांस दरमहा रक्कम रु. ५,०००/- अंतरिम पोटगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

**<u>थोडक्यात वस्तुस्थिती अशी आहे की,</u>**

२. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ याची कायदेशीर पत्नी आहे. त्यांचे लग्न दिनांक ९/०५/२००६ रोजी झाले. गैरअर्जदार क्र. २ व ३ हे गैरअर्जदार क्र.१ चे नातेवाईक आहेत. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदार याच्या घरी राहण्यास गेली. गैरअर्जदार हे अर्जदारासोबत दोन महिणे व्यवस्थित राहिले. त्यानंतर त्यांनी तिला मारहाण करण्यास सुरुवात केली. तो तिच्यावर संशय घेत असे. तसचे पैशाची मागणी करत असे. त्याने दुचाकी खेरदीसाठी तिला रक्कम रु. ६०,०००/- आणण्यासाठी सांगितले. अर्जदाराने सदर गोष्टीला नकार दिला. तेव्हा गैरअर्जदार क्र.१ याने तिला मारहाण केली तसेच जाळून टाकण्याची धमकी दिली. त्यामुळे अर्जदाराने तिच्या वडीलांना फोन केला. तिचे वडील सासरी आले. तेव्हा त्यांनी गैरअर्जदारांना विनंती केली व ते मजुर असल्यामुळे एवढे पैशे देवु शकत नाही असे सांगितले. अर्जदार व तिच्या आईवडीलांनी ब-याच वेळा गैरअर्जदारांना विनंती केली. परंतु गैरअर्जदाराने अर्जदाराला स्विकारण्यास नकार दिला. लग्नामध्ये हुंडा दिला नाही असे ते म्हणत असत.

३. अर्जदारास उत्पन्नाचे साधन नाही. ती स्वत:चा सांभाळ करु शकत नाही. उलटपक्षी गैरअर्जदार क्र. १ हा नोकरी करतो. त्याला महिण्याला रक्कम रु. २०,०००/- मिळतात. तसेच त्याची शेती आहे. त्याला वार्षिक दहा लाख रुपये उत्पन्न मिळते. गैरअर्जदार याने अर्जदाराचा त्याग केल्यापासुन अर्जदाराचे पालनपोषणाची जबाबदारी पार पाडलेली नाही. त्यामुळे अर्जदाराने सदरचा अंतरिम पोटगीचा अर्ज केला आहे.

**४.** गैरअर्जदार यांना नोटीस तामिल होउनसुद्धा ते हजर झाले नाही.

**५.** अर्जदार यांच्या वकीलांनी युक्तीवाद केला.

| **अ.क.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही जाबदेणाराने तिच्या विरूध्द घरगुती हिंसाचार केला काय ही बाब प्रथमदर्शनी सिध्द करते का ? | होय. |
| २. | अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? असल्यास किती ? | होय.<br>अर्जदारांस दरमहा रू. १५००/– |
| ३. | कोणता आदेश ? | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |

**६.** अर्जदाराने अर्जाचे पृष्टयर्थ स्वतःचे शपथपत्र सादर केले आहे. अर्जदाराने लग्नपत्रिका दाखल केली आहे.

**<u>मुद्दा क. १ व २ साठी</u>**

**७.** अर्जदाराच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की यातील गैरअर्जदारांनी अर्जदारांविरूध्द घरगुती हिंसाचार केलेला आहे. त्यामुळे अर्जदारास पोटगी मिळण्याचा अधिकार आहे ही बाब सिध्द करण्यासाठी अर्जदाराने तिचे शपथपत्र दाखल केलेले आहे.

**८.** घरगुती हिंसाचार कायदयाप्रमाणे कलम २३ च्या अर्जाचा विचार करता अर्जदाराने प्रथमदर्शनी तिच्यावर घरगुती हिंसाचार झाला ही बाब दाखविणे महत्वाचे आहे. ही बाब दाखविण्यासाठी अर्जदाराने तिचे शपथपत्र दाखल केलेले आहे. शपथपत्रामध्ये अर्जदार हिने गैरअर्जदारांनी तिच्या विरूध्द केलेल्या घरगुती हिंसाचाराचे कथन केलेले आहे. यामध्ये महत्वाची गोष्ट म्हणुन गैरअर्जदारांनी अर्जदारास हिला शारिरीक व मानसिक त्रास दिलेला आहे असे कथन केलेले आहे. गैरअर्जदार क.१ यानी अर्जदार यांच्या पालनपोषनाची कोणतीही व्यवस्था केलेली नाही असेही कथन केलेले आहे.

**९.** अर्जदाराची अर्जामधील वरील कथने पाहता व अर्जदाराने गैरअर्जदारांविरूध्द दाखल केलेले प्रकरण पाहता गैरअर्जदाराने अर्जदाराविरूध्द

प्रथमदर्शनी घरगुती हिंसाचार केला ही बाब स्पष्ट होते. याठिकाणी हे नमुद करणे योग्य होईल की, अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह सन २००६ साली झाला. अर्जदाराची कथने पाहता गैरअर्जदारांनी अर्जदाराची पालनपोषण करण्याची जबाबदारी पार पाडली नसल्याचे स्पष्ट दिसुन येते.

**१०.** घरगुती हिंसाचार कायदयामध्ये घरगुती हिंसाचार या शब्दाची व्याख्या दिलेली आहे व सदर व्याख्यानुसार स्त्रीचे पालनपोषण न करणे हे सुध्दा हिंसाचार या व्याख्येत बसते. सदर केस पाहता गैरअर्जदाराने अर्जदारास पालनपोषणासाठी काही रक्कम दिली असे कुठेही रेकॉर्डवरून दिसुन येत नाही. तसेच गैरअर्जदाराची अर्जदारास सांभाळण्याची जबाबदारी असताना त्याने ती जबाबदारी पार पडलेली नाही. त्यामुळे अर्जदाराने प्रथमदर्शनी घरगुती हिंसाचार झाला ही बाब सिध्द केलेली आहे.

**११.** अर्जदाराने गैरअर्जदाराच्या उत्पन्नाचा कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. तिने गैरअर्जदार हा मासिक रु. २०,०००/- उत्पन्न मिळवत असल्याचे कथन केले आहे. तसेच शेतीमधुन त्याला वार्षिक दहा लाख रुपये मिळतात असे कथन केले आहे. अर्जदाराला सांभाळण्याची सर्वस्वी जबाबदारी गैरअर्जदार याची आहे. सदरची जबाबदारी तो नाकारु शकत नाही. त्यामुळे गैरअर्जदार याने अर्जदारास दरमहा रक्कम रूपये १,५००/- इतकी पोटगी या अर्जदाखल तारखेपासुन देणे योग्य राहील. म्हणुन मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर होकारार्थी देउन मुद्दा क्र. ४ साठी खालील आदेश पारीत करीत आहे-

## <u>आदेश</u>

१. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदाराला दरमहा रक्कम रू. १५००/- (रूपये एक हजार पाचशे फक्त) इतकी पोटगी अर्ज दाखल तारखेपासुन दयावी.

२. या अर्जाचा खर्च वादाच्या अनुषंगाने आकारण्यात येईल.

दिनांक : १२/०५/२०२२

(एस.एस.गाडवे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कामठी

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file are word to word as per it's original.

Name of Stenographer : Rajesh Jaidevji Khobragade,<br>Stenographer Grade-III<br>Attached to Jt. CJJD & JMFC,<br>Kamptee.